**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अॅग्रोमेट अॅडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 05-04-2022**

**नागपूर (महाराष्ट्र) मध्ये कामठी साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-04-05 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-04-06 | 2022-04-07 | 2022-04-08 | 2022-04-09 | 2022-04-10 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 40.9 | 40.9 | 40.9 | 40.9 | 41.9 |
| किमान तापमान (अं.से) | 23.8 | 23.8 | 23.8 | 24.8 | 24.8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 66 | 68 | 67 | 69 | 64 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 41 | 42 | 45 | 43 | 44 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 7.0 | 8.0 | 8.0 | 9.0 | 10.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 200 | 185 | 203 | 204 | 95 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 2 | 2 | 2 | 2 |

## हवामान सारांश / चेतावणी:

कामठी तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक ०६ ते १०, एप्रिल, २०२२ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता व हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

फळबागा, भाजीपाला व उन्हाळी पिकांना गरजेनुसार हलके व वारंवार ओलीत करावे.उन्हाळी भुईमुग पिकामध्ये आऱ्या धरण्याच्या अवस्थेमध्ये आंतरमशागतीची कामे टाळावे.रब्बी हंगामातील पिकांच्या काढणी केलेल्या शेतांची नांगरणी करावी. मळणीची कामे शक्य नसल्यास काढणी केलेला शेतमाल प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा.पिक वाढीच्या नाजूक अवस्थामध्ये ओलिताची वारंवारता वाढवावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी शेतातील कामे करतांना सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी प्राधान्य द्यावे. दुपारच्या वेळी प्रखर सूर्य प्रकाश असताना काम करणे टाळावे. शेतात कम करताना पुरेसे स्वच्छ व थंड पाणी प्यावे. परिपक्व अवस्थेतील गहू, हरभरा, गहू, मोहरी, जवस इत्यादी पिकाची काढणी व मळणी ची कामे सकाळ व संध्याकाळच्या वेळी करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

उष्णतेपासून संरक्षणासाठी जनावरांना दुपारच्या वेळी चारावयास टाळावे.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | तापमानातील वाढ लक्षात घेता,भुईमूग पिकास ०८ ते १० दिवसाच्या अंतराने पिकाची गरज व जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन हलके व वारंवार ओलीत करावे. आऱ्या सुटल्यानंतर आंतरमशागत करू नये. भुईमुग पिकाला आऱ्या तयार होण्याची अवस्था ते शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये पाण्याच्या ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. शक्य असल्यास ओलीत करण्याकरिता तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा. वाढते तापमान लक्षात घेता, जमिनीचा प्रकार आणि पिकाच्या आवश्यकतेनुसार ८ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. पिकावरील तांबेरा आणि टिक्का या रोगाचे नियंत्रणाकरिता टेबूकोनाझोल २५ टक्के डब्ल्यू. जी. ५०० ते ७५० ग्राम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून (१० ते १५ ग्राम प्रती १० लिटर पाणी) फवारणी करावी.फूलकिड्यांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी ५ फुलकिडे प्रति शेंडा गाठल्यावर क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १४०० मिली प्रति हेक्टरी ५०० लिटर (२८ मी.ली./१० लिटर पाणी) पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| हरभरा | परिपक्व अवस्थेतील हरभरा पिकाची काढणी व मळणी ची कामे सुरु ठेवावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| गहू | परिपक्व अवस्थेतील गहू पिकाची काढणी व मळणी ची कामे सुरु ठेवावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| भेंडी | भेंडी पिकावर, मावा, तुडतुडे, फुलकिडे या रसशोषक किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणाकरिता थायामिथोक्साम २५ टक्के विद्राव्य दाणेदार २ ग्राम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| आंबा | आंब्याच्या मोहोरावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास तुडतुडे किडीच्या व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % प्रवाही १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % प्रवाही ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन५ टक्के प्रवाही ५ मिली किंवा मिथाईल डिमेटोन २५ टक्के प्रवाही १० मिली किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.आंबावरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनाझोल ५ टक्के प्रवाही १० मिली किंवा पेनकानझोल १० टक्के प्रवाही ५ मिली किंवा सल्फर ८० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ३० ग्राम किंवा डिनकॅप ४८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.आंबा पिकावरील फळगळ कमी करण्यासाठी २० पीपीएम नॅफथालिक एसिटिक एसिड (एनएए) १० लिटर पाण्यात मिसळून मोहोरावर फवारणी करावी. |
| कोबी | कोबी व फुल कोबीवरील वरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी १३ मिली किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| फुल कोबी | कोबी व फुल कोबीवरील वरील चौकोनी ठीपक्याच्या पतंग कीड व्यवस्थापनासाठी, क्लोरपायरीफॉस २० ईसी ४० मिली किंवास्पिनोसॅड २.५ एससी १२ मिली किंवा फेनवलेरेट २० ईसी ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| संत्रा | तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला १४ ते ६३ लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ८७ ते १४३ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १६३ ते २०४ लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. तापमानातील वाढ लक्षात घेता शेतातील गवत, तणस, गव्हांडा, कुटार असल्यास झाडाभोवती ५ ते १० सेमी. थर देऊन आच्छादन द्यावे, यामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते व जमिनीत ओलावा टिकून राहतो आणि आंबिया बहराची फळगळ कमी होण्यास मदत होते. |
| संत्रा | फळ गळ व्यवस्थापनासाठी जिब्रेलिक आम्ल १.५ ग्राम आणि युरिया १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे आंबिया बहार चांगला येण्यास मदत होते. (जिब्रेलिक आम्ल पाण्यात मिसळण्या पूर्वी १० मिली अल्कोहोल मध्ये मिसळावे). तापमानातील वाढ (४१ ते ४२ अंश सेल्सियस) लक्षात घेता २-४ डी १.५ ग्राम आणि पोटाशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मिरची | फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मी.ली., प्रती ९ लिटर पाण्यात मिसळून मिरची लागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी. सद्यपरिस्थितीत मिरची पिकावरील रसशोषक किडीच्या नियंत्रणाकरिता, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| टोमॅटो | टमाटे पिकामध्ये नागअळी, मावा, फुलकिडे, पंढरी माशी व फळे पोखरणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १८.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. जनावरांकडून (उदा. बैल) सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजता दरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. जनावरांना चरण्यासाठी सकाळी किंवा संध्याकळी सोडावे. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| चिकन | उष्णतेपासून संरक्षण मिळण्यासाठी कोंबड्यांच्या शेड ला कापडी पडदे लावावे तसेच हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |